Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VI ISSUE-IX SEPTEMBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# भारतातील दारिद्रय : एक दृष्टीक्षेप

**प्रा.डॉ. मुडेकर तेजस्विनी बी.**
प्रोफेसर व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कमला कॉलेज, कोल्हापूर

"A country is poor because it is poor" प्रा.नर्क्स

## ● प्रस्तावना :

दारिद्रय ही भारतातील पुरातन समस्या आहे. ही संकल्पना केवळ उत्पन्न व उपभोगाशी निगडीत नसून ती आरोग्य, शिक्षण व मनोरंजन याही बाबींशी निगडीत आहे. दारिद्रय ही आर्थिक व सामाजिक घटना असून ते एक वास्तव आहे. भारतातील दारिद्रयावर सर्व प्रथम श्री दादाभाई नौरोजी यांनी "Poverty and Unbritish Rule in India" या ग्रथाद्वारे प्रकाश टाकला. स्वातंत्र्योत्तर काळात नियोजनबध्द विकासाची प्रक्रिया राबविताना दारिद्रय निर्मूलन, उत्पन्न व संपत्तीचे समानवाटप, रोजगार निर्मिती या बाबींवर भर दिल्याचे दिसते. परंतु वाढत्या लोकसंख्येच्या रेटयाने भारतापुढील समस्यांची तीव्रता थोडी कमी करता आली तरी त्याचे समुळ उच्चाटन करणे अजूनही शक्य झाले नाही. दारिद्रयरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण कमी करत असताना देशात उत्पन्न व संपत्तीची विषमता वाढताना दिसते. आर्थिक वृध्दी साध्य करीत असताना विषमतेचे प्रमाण वाढू न देण्यासाठी सरकारला विशेष प्रयत्न करावे लागतात.

## ● शोधनिबंधाची उद्दिष्टे:—

1. दारिद्रयाची संकल्पना अभ्यासणे.
2. भारतातील दारिद्रयाचे वास्तव अभ्यासणे.
3. दारिद्रय निर्मूलनसाठी धोरणात्मक उपाय सूचविणे.

## ● अभ्यास पध्दती :

सदर शोधनिबंध दुय्यम सामग्रीवर आधारित असून आवश्यक सांख्यिकी संदर्भग्रंथ, आर्थिक मासिके, अहवाल सरकारच्या अधिकृत वेबसाईटस् याद्वारे संकलित करून त्याचे विश्लेषण केले आहे.

## ● दारिद्रयाची संकल्पना :

ज्यांना आपल्या उत्पन्नातून अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या किमान आवश्यक गरजाही पूर्ण करता येत नाहीत त्या लोकांना दारिद्रय रेषेखालील लोक असे म्हणतात. दारिद्रय, निर्धनता, गरिबी हे शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. समाजातील एक मोठा भाग जेव्हा न्यूनतम जीवनस्तरापासून वंचित राहतो किंवा केवळ निर्वाह पातळीवर जीवन जगत असतो तेव्हा समाजात व्यापक निर्धनता आहे असे म्हटले जाते.

आंतरराष्ट्रीय दारिद्रयरेषेने निर्देशित केलेल्या किमान उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न मिळविणारे लोक निव्वळ दरिद्री या संकल्पनेत मोडतात. दारिद्रयाची निर्मिती ही अत्यंत कमी दरडोई उत्पन्न आणि त्या उत्पन्नाची असमान रितीने झालेली विभागणी यातून झालेली दिसते.

## ● दारिद्रयाची व्याख्या :

1. **गिलीन आणि गिलीन** — ''दारिद्रय ही अशी अवस्था आहे की ज्यात व्यक्ती अपुऱ्या उत्पन्नामुळे असो की अनावश्यक खर्चामुळे असो ज्या समाजात ती राहते तेथील राहणीमानाचा दर्जा गाठू शकत नाही की जो त्याची शारीरिक व मानसिक कार्यक्षमता वाढवेल.''
2. **प्रा. अमर्त्यसेन** — ''एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्रय होय.
3. **गोडार्ड** — ''दारिद्रय म्हणजे स्वतःचे व स्वतःवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीचे पालन पोषण करण्यासाठी, तसेच निरोगी उत्साही राहण्यासाठी लागणाऱ्या जरूरीच्या वस्तूंचा अपुरा पुरवठा होय''.
4. **किमान गरजा व प्रभावी मागणीच्या अंदाजासाठी नेमलेला तज्ञ गट (1980—85)** — ''ग्रामीण भागासाठी दररोज प्रतीव्यक्ती किमान

2400 कॅलरीज व शहरी भागासाठी किमान 2100 कॅलरीज मिळण्यासाठी लागणारे उत्पन्न मिळविण्यासाठीची असमर्थता म्हणजे दारिद्रय होय.''

**5.वर्ल्ड डेव्हलमेंट रिपोर्ट (2000–2001)** – ''दारिद्रय म्हणजे योग्य पध्दतीचे अन्न व निवारा यांचा अभाव. ही अशी स्थिती आहे की, त्या व्यक्तीस सुयोग्य पध्दतीचे राहणीमान, सुव्यवस्थित राहण्याची घरे, आरोग्य सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळत नाही.''

- **महत्वाच्या संकल्पना व दारिद्रयाचे मापन :**

**1.मानव विकास निर्देशांक (Human Development Index) HDI :**

सन 1990 पासून यूनाने मानव विकास अहवाल प्रसिध्द करण्यास सुरवात केली. मानव विकास निर्देशांक तयार करताना अपेक्षित आर्युमर्यादा, प्रौढ साक्षरता, एकत्रित नावनोंदणी प्रमाण, समायोजन वास्तव दरडोई उत्पन्नाचा विचार केला जातो.

सन 1995 मध्ये जगातील 174 देशांचा मानव विकास निर्देशांक मोजला होता. तेव्हा भारताचा 134 वा क्रमांक होता. सन 2010 च्या मानव विकास निर्देशांकात 183 देशांच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक 119 वा होता. नोव्हेंबर 2011 रोजी संयुक्त राष्ट्र संघाने 187 देशांचा मानव विकास निर्देशांक तयार केला. त्यावेळी भारत पुन्हा 134 व्या क्रमांकावर गेला व भारताचे निर्देशांकमूल्य 0.519 होते. मानव विकास निर्देशांक 2012 नुसार, 2012 मध्ये भारतातील दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न 3,285 डॉलर्स, आर्युमर्यादा 65.8 वर्षे, शाळेची वर्षे 4.4 अपेक्षित शाळेची वर्षे 10.7 होती. मानव विकास निर्देशांक 2013 नुसार 187 देशांमध्ये भारताचा 136 वा क्रमांक असून निर्देशांक मूल्य 0. 554 झाले.

**2.बहुआयामी दारिद्रय निर्देशांक (Multidimensional Poverty Index) :** 1997 पासून मानवविकास अहवालात मानव दारिद्रय निर्देशांक काढला जात होता. 2010 पासून त्याऐवजी बहुआयामी दारिद्रय निर्देशांक काढला जातो. या निर्देशांकात लोकांचे राहणीमान, आरोग्य आणि शिक्षणातील अभावाची तीव्रता आणि गरीबी विचारात घेतली जाते. मानव विकास अहवाल 2011 नुसार भारताच्या बहुआयामी दारिद्रय निर्देशांक 0.296 असून भारताचा क्रम 119 वा लागतो. मानव विकास अहवाल 2013 मध्ये 104 देशांच्या दारिद्रयाचा अभ्यास करता. या देशातील 30% जनता दारिद्रयात जीवन जगत होती. त्यापैकी निम्मे लोक हे दक्षिण आशियाई देशातील होते. या अहवालानुसार भारतातील 53.7% जनता म्हणजे 61.22 कोटी लोकसंख्या दारिद्रयात जीवन जगत होती.

**3. वैश्विक भूक निर्देशांक (Global Hunger Index) GHI :** अमेरिकेतील 'International Food Policy Research Institute', जर्मनीतील 'Wel hunger hilfe' व आर्यलँड येथील 'Concern World Wide' या संस्थांनी मिळून 11 ऑक्टोबर 2010 रोजी 122 देशांकरिता वैश्विक भूक निर्देशाक बनविला. हा निर्देशाक बनविताना विकसित देशांना वगळण्यात आले. हा निर्देशांक तयार करताना एकूण लोकसंख्येपैकी कमी पोसलेल्यांची/अवपोषितांची (Undernourished) संख्या, पाच वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलांपैकी कमी वजन असलेल्या मुलांची संख्या, पाच वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या मुलांमध्ये मृत्यूदर या घटकांचा विचार केला जातो.

गरिबी व भूक यांचा अगदी जवळचा संबंध असतो. 2010 च्या वैश्विक भूक निर्देशांकानुसार 122 देशांपैकी 29 राष्ट्र धोक्याच्या व अतिशय धोक्याच्या स्थितीत आहेत. त्यापैकी भारत एक आहे. 2009 मध्ये भारताचा भकुनिर्देशांक 23.9 होता, तो घटण्याऐवजी वाढून 2010 ला 24.1 झाला आहे. 2010 च्या WHO च्या अहवालानुसार 2005–06 मध्ये भारतातील पाच वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलांपैकी 44% मुले ही कमी वजनाची होती. तर 2010 च्या GHI नुसार भारत हा असा देश आहे. ज्या ठिकाणी जगातील पाचपेक्षा कमी वय असणाऱ्या एकूण कमी वजनाच्या मुलांपैकी 42% मुले आहेत.

- **भारतातील दारिद्र्याची वास्तवता :**

भारत सरकारच्या नियोजन आयोगाद्वारे सतत दारिद्र्य विषयक अभ्यास केला जातो. त्यासाठी विविध समित्यांची स्थापना केली जाते. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात तज्ञांनो अभ्यासपूर्वक भारतीय दारिद्र्याची वास्तवता मांडली आहे.

**1. दादाभाई नौरोजी** : दादाभाई नौरोजी यांनी 1876 मध्ये ब्रिटीश राजवटीने प्रसिध्द केलेल्या आकडेवारीच्या आधारे भारतातील दारिद्रयाची तीव्रता स्पष्ट केली. त्यांच्या मते त्यावेळी किमान जीवनमान प्राप्त करण्यासाठी 34 रू. ची आवश्कता होती. मात्र भारतीयांचे दरडोई उत्पन्न 20 रू. होते.

**2. श्री ओझा :** ओझा यांच्या मते व्यक्तीला दररोज किमान 2550 उष्मांकाची गरज असते. परंतु ज्या व्यक्तीच्या आहारातून 2250 उष्मांकापेक्षा कमी उष्मांक मिळतात. त्या व्यक्तीस दरिद्री समजावे. त्यांच्या मते भारतात 1960–61 मध्ये 51.8% लोक दारिद्रयरेषेखाली होते. तर 1967–68 मध्ये हे प्रमाण वाढून 70% झाले.

**3. श्री. वि.म. दांडेकर व रथ :** श्री दांडेकर व रथ यांनी ओझा यांची उष्मांकाची अट मान्य केली व 1960–61 च्या किंमतींचा आधार घेऊन शहरी भागात 270 रू. पेक्षा कमी उत्पन्न व ग्रामीण भागात 180 रू. पेक्षा कमी उत्पन्न मिळविणारी व्यक्ती दरिद्री असे संबोधिले. त्यांच्यामते 1968–69 मध्ये शहरी भागातील 40% लोक व ग्रामीण भागातील 50% लोक दारिद्रय रेषेखाली होते.

**4. श्री बी.एस.मिन्हास :** श्री.मिन्हास यांनी दरडोई किमान उपभोग खर्च या निकषाच्या आधारे 1956–57 मध्ये 65% लोक दारिद्र्यरेषेखाली होते व ते प्रमाण 1967–68 मध्ये 50.6% पर्यंत कमी झाल्याचे नमूद केले आहे.

**5. डॉ. वर्धन :** डॉ. वर्धन यांनी नियोजन मंडळाचा किमान खर्चाचा निकष गृहीत धरून 1960–61 मध्ये ग्रामीण भागातील एकूण लोकसंस्थ्येची 38% तर 1968–69 मध्ये 54% लोक दारिद्रयरेषेखाली जीवन जगत होते असे स्पष्ट केले आहे.

**6.श्री मॉन्टेकसिंग अहुलवालिया :** श्री. अहुलवालिया यांच्या मते भारतातील ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येपैकी दारिद्रयरेषेखाली जीवन जगणारी लोकसंख्या 1956–57 मध्ये 54. 1%, 1967–68 मध्ये 56.5% तर 1973–74 मध्ये 46.1% होती.

**7.सातवा वित्त आयोग (1978)** : या आयोगाच्या अंदाजानुसार 1970–71 मध्ये देशातील 52% लोक दारिद्रयरेषेखाली होते.

**8. जागतिक बँकेचा अंदाज** : 1983 मध्ये ग्रामीण भागात दरमहा दरडोई 89.0 रू. व शहरी भागात 112.2 रू. ही दारिद्रयरेषेचो किमान मर्यादा ठरविण्यात आली. त्यानुसार 1988 मध्ये देशातील 39.6% लोक दारिद्रयात तर 19.2% लोक अति दारिद्रयात होते.

**9. जागतिक बँक–जागतिक दारिद्रय रेषा :** सन 2008 मध्ये जागतिक बॅकेने जागतिक दारिद्रयरेषा तयार केली. त्यानुसार ज्या व्यक्तीचे उत्पन्न प्रतिदिन 1.25 डॉलरपेक्षा कमी आहे ती व्यक्ती दारिद्रय रेषेखालील समजावी. त्यानुसार भारतात दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्याची संख्या 1981 मध्ये 59.8%, 1990 मध्ये 51.3% व 2005 मध्ये 41.6 होती.

**10.प्रा.सुरेश तेंडुलकर समिती :** भारतीय नियोजन आयोगाने सन 2005 मध्ये प्रा.सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अस्तित्वातील निकषांच्या अभ्यास करून काही पायाभूत बदल सूचविले व बहुआयामी निकष आमलात आणून दारिद्रय निर्धारित केले. त्यांनी नवी दारिद्रयरेषा निर्धारित केली.

**तक्ता क्र. 1**
**भारतातील दारिद्र्याचा अंदाज**
**(तेंडुलकर समिती पध्दती)**

| अ. क्र. | वर्ष | दरिद्री लोकसंख्या (%) | | | दरिद्री लोकसंख्या (दशलक्ष) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण |
| 1. | 1993–94 | 50.1 | 31.8 | 45.3 | 328.6 | 74.5 | 403.7 |
| 2. | 2004–05 | 41.8 | 25.7 | 37.2 | 326.3 | 80.8 | 407.1 |
| 3. | 2009–10 | 33.8 | 20.9 | 29.8 | 278.2 | 76.5 | 354.7 |
| 4. | 2011–12 | 25.7 | 13.7 | 21.9 | 216.5 | 52.8 | 269.3 |
| वार्षिक सरासरी घट 1993 ते 2004–05 (%) | | 0.75 | 0.55 | 0.74 | | | |
| वार्षिक सरासरी घट 2004–05 ते 2011–12 (%) | | 2.32 | 1.69 | 2.18 | | | |

आधार : Govt. of India Press Information Bureau Poverty Estimates for 2011-12

2004–05 मध्ये ग्रामीण भागासाठी दरडोई उत्पन्न दरमहा 446.68 रू. शहरी भागासाठी 578.80 रू. निश्चित करण्यात आले. त्यानुसार ग्रामीण भागातील 41.8% व शहरी भागातील 25.7% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली होती. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी 37.2% लोक दारिद्र्य रेषेखाली होते. तेंडुलकर समितीने सन 2011–12 साठी ग्रामीण भागासाठी प्रतिदिन दरडोई उत्पन्न 27 रू. व शहरी भागासाठी 32 रू. निश्चित केले व त्यानुसार भारतातील 21.9% लोक दारिद्र्यात होते असे स्पष्ट केले.

**11. रंगराजन समिती** – सन 2013 मध्ये भारतातील दारिद्र्याचे वास्तव अभ्यासण्यासाठी रंगराजन समितीची नियुक्ती करण्यात आली. या समितीने NSSO च्या 68 व्या फेरीतील Modified Mixed Recall Period Consumption Expenditure Data चा आधार घेऊन दारिद्र्यरेषेची निश्चिती केली व जून 2014 मध्ये आपला अहवाल सादर केला. ग्रामीण भागासाठी प्रतिदिन दरडोई उत्पन्न 33 रू. व शहरी भागासाठी 47 रू. उत्पन्न निश्चित करण्यात आले. पाच माणसांचे कुटुंब ग्रहीत धरता कौटुंबिक मासिक उपभोग खर्च ग्रामीण भागासाठी 4860 रू. तर शहरी भागासाठी 7035 रू. असा निश्चित केला. या समितीच्या मते भारतातील दर 10 व्यक्तींमागे 3 व्यक्ती दरिद्री आहेत. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी 29.5% लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठत आहेत. तेंडूलकर समितीच्या मते सन 2009–10 मध्ये भारतातील 354 दशलक्ष व सन 2011–12 मध्ये 269 दशलक्ष लोक दारिद्र्यरेषेखाली होते. रंगराजन समितीच्या मते सन 2009–10 मध्ये 454.6 दशलक्ष व सन 2011–12 मध्ये 363 दशलक्ष लोक दारिद्र्यरषेखाली होते.

**तक्ता क्र. 2 भारतातील दारिद्र्याचा अंदाज (रंगराजन समितीनुसार)**

| अ. क्र. | वर्ष | दरिद्री लोकसंख्या (%) | | | दरिद्री लोकसंख्या (दशलक्ष) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शळरी | एकूण | ग्रामीण | शळरी | एकूण |
| 1. | 2009–10 | 39.6 | 35.1 | 38.2 | 325.9 | 128.6 | 454.6 |
| 2. | 2011–12 | 30.9 | 26.4 | 29.5 | 260.5 | 102.5 | 363.0 |

**आधार** : Report of The Expert Group To Review The Methodology for measurement of poverty (June - 2014) Chairman - Dr.C. Rangarajan.

तक्ता क्र. चा अभ्यास करता 2009–10 ते 2011–12 या दोन वर्षांच्या काळात ग्रामीण, शहरी व एकूण दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येत 8.7% नी घट झाली आहे आणि 91.6 दशलक्ष लोक दारिद्ररेषेच्या वर आले आहे.

- **दारिद्रय निर्मूलनाचे उपाय :**

भारतातील दारिद्रयाचे निर्मूलन हे धोरणकर्त्यांसाठी एक आव्हान आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सरकारने विविध कार्यक्रम व योजनांद्वारा दारिद्रय कमी करण्याचे प्रयत्न केले आहेत. यामध्ये पुढील उपाययोजनांचा उल्लेख करता येईल. बेकारी आणि दारिद्रय यांचा अन्योन्य संबंध असल्याने रोजगार निर्मितीसाठी योजलेल्या सर्व उपायांचा यात समावेश होतो.

1. सामुदायिक विकास योजना (1952). 2. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (1976–77). 3. वीस कलमी कार्यक्रम (1976). 4. लघु शेतकरी विकास योजना (1971). 5. सीमान्त शेतकरी व शेतमजूर विकास संस्था (1969). 6. किमान गरजा कार्यक्रम (1974). 7. आवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (1973). 8. वाळवंट विकास कार्यक्रम (1977). 9. राष्ट्रीय ग्रामीण विकास कार्यक्रम (1980). 10. ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी योजना (1983). 11. स्त्रिया व बालक विकास योजना (1987–88). 12. स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण (ट्रायसेम) (1979). 13. ग्रामीण विकासाचा धडक कार्यक्रम (1961). 14. अंत्योदय योजना (1977). 15. जवाहर रोजगार योजना (1989). 16. पंतप्रधान एकात्मिक शहरी दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम (1995–96). 17. नवीन रोजगार निर्मिती योजना (1993). 18. पंतप्रधान रोजगार योजना (1993). 19. महिला समध्दी योजना (1993). 20. स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (1999). 21. सार्वजनिक वितरण व्यवस्था. 22. अंत्योदय अन्न योजना (2002). 23. मध्यान्ह भोजन योजना. 24. अन्नपूर्णा योजना (1961).

- **12 वी पंचवार्षिक योजना व दारिद्रय निर्मूलन :**

12 व्या पंचवार्षिक योजनेचे ध्येय हे वेगवान, शाश्वत वा अधिक समावेशक वृध्दी हे आहे. त्यात दारिद्रय निर्मूलनाद्वारे समावेशकता हा एक भाग येतो. जे गरीब व अत्यंत गरीब आहेत त्यांच्या पर्यंत फायदे पोहोचविणे. तसेच या योजनेत धोरणांची आखणी करताना दारिद्रय निर्मूलनावर अधिक भर देण्यात येणार आहे. 10% पर्यंत दारिद्रय घटविणे हे ध्यये ठेवण्यात आले आहे. बिगर शेती क्षेत्रात 50 दशलक्ष नविन रोजगार संधींची निर्मिती केली जाणार असून कौशल्य विकासावर भर दिला जाणार आहे.

- **निष्कर्ष :**

1. दारिद्रय ही संकल्पना केवळ उत्पन्नाशी निगडीत नसून ती आरोग्य, शिक्षण व इतर अनुषंगिक बाबींशी निगडीत आहे.
2. मानव विकास निर्देशांक 2013 नुसार 187 देशांमध्ये भारताचा 136 वा क्रमांक लागतो व निर्देशांक मूल्य 0.554 इतके आहे.
3. मानव विकास अहवाल 2011 नुसार भारताचा बहुआयामी दारिद्रय निर्देशांक 0.296 असून भारताचा 119 वा क्रमांक लागतो.
4. 2010 च्या वैश्विक भूक निर्देशांकानुसार भारताचा भूक निर्देशांक 24.1 आहे.
5. विविध अभ्यासगट व समित्यांच्या दारिद्रय निर्धारणाच्या निकषांमध्ये तफावत आहे. त्यामुळे विविध समित्यांनी भारतातील दारिद्र्याची वास्तवता वेगवेगळी वर्णिलेली आहे.
6. दारिद्रय निर्मूलनाचे विविध उपाय योजूनही भारतात अजूनही ¼ पेक्षा अधिक जनता दारिद्रय रेषेखाली जीवन कंठत आहे. हे एक मोठे अपयश आहे.

- **शिफारशी :**

1. दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम परिणामकारक व पारदर्शीपणे राबवावेत. भ्रष्टाचारी कर्मचाऱ्यांना कडक शासन करून योजनांचे फायदे तळापर्यंत पोहचवावे.

2. स्थानिक साधनसामग्रीचा वापर करून स्थानिक लोकांच्या मदतीने स्थानिक मागणी असणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीचे उद्योग सुरू करावेत व त्यांच्या निर्मितीसाठी सरकारने सहाय्य करावे.
3. स्वयंरोजगारावर भर द्यावा. कौशल्य प्राप्त तरूण लोकसंख्या वाढण्यासाठी कौशल्य विकासाचे खास कार्यक्रम राबवावेत.
4. सरकारी योजनांबाबत जनतेचे प्रबोधन करावे. योजनांचा लाभ अधिकाधिक जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. स्वयंसेवी संस्थांना पुरेशी आर्थिक मदत करून दारिद्र्य निर्मूलन अभियानात सामिल करून घ्यावे.
5. सर्वसाधारण शिक्षण, तांत्रिक शिक्षण, स्त्री शिक्षण व प्रौढांचे शिक्षण यावर भर द्यावा.
6. दारिद्र्य रेषेखालील जनतेचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. शिक्षणाचे महत्व त्यांना पटवून द्यावे. जेणेकरून अंधश्रध्दांपासून ते दूर रहातील. तांत्रिक शिक्षणाद्वारे रोजगारक्षम होतील. व्यसनाधिनता कमी करण्यासाठी प्रयत्न करावे. अयोग्य सामाजिक रूढीतील अनावश्यक उपभोग खर्च की ज्याद्वारे अनुत्पादक कर्जे घेतली जातात, ती टाळण्यासाठी प्रबोधन करावे. सरकारी योजनांचा लाभ घेण्याविषयी जागृकता निर्माण करावी. जीवनाकडे पहाण्याचा सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे.

## सारांश :

जागतिक महासत्ता होण्याच्या वाटेवर असणाऱ्या देशात भारतात दारिद्र्य हा एक कलंक आहे. तो पुसण्यासाठी दारिद्र्य निर्मूलनाचे प्रभावी उपाय योजणे गरजेचे आहे. अमर्त्य सेन यांच्या मते ''सर्वसमावेश वृध्दी नसेल तर वेगवान आर्थिक वृध्दी अर्थहीन आहे.''

## संदर्भ :

1. डॉ.पाटील जे.एफ. – 'अर्थदर्शन', (2009), फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2. Agrawal A.N. 'Indian Economy', 36th Edition (2010) New Age International (P) Ltd., New Delhi.
3. Datt & K.P.M. Sundharam - 'Indian Economy'. Sixty first Edition (2010), S. Chand & Company Ltd., New Delhi.
4. Puri & Misra - 'Indian Economy', 31st Edition (2013), Himalaya Publishing House Pvt. Ltd., Mumbai.
5. Economic survey of India 2013-14.
6. Government of India, planning commission, Report of the Expert Group of Review the methodology for Estimation of Poverty (Tendulkar Committee) submitted in November, 2009.
7. Government of India, Planning Commission, Report of the Expert. Group to Review the Methodology for Estimation of poverty (Rangarajan Committee) submitted in June, 2014.
8. अर्थ संवाद चे विविध अंक.
9. 'शिवार्थ', शिवाजी युनिर्व्हसिटी इकॉनॉमिक्स असोसिएशनचे 23 वे वार्षिक अधिवेशन फेब्रुवारी 2013 (स्मरणिका).
10. भारत सरकारच्या अधिकृत वेबसाईटस.